Vol 1 Issue 4 Oct 2011 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.in**

Golden Research Thoughts
Volume 1, Issue. 4, Oct. 2011
ISSN:-2231-5063 Available online at www.aygrt.isrj.net

RESEARCH PAPER

GRT

# *शिलालेख – मराठ्यांच्या इतिहासाची महत्त्वपूर्ण साधने*

*अनिल माणिकराव बैसाणे,*

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

***सांराश :***

ज्या गोष्टीवरून इतिहासाचा अभ्यास करतांना भूतकालीन मानवी जिवनाविषयी महत्त्वपूर्ण अशी माहिती मिळते किंवा इतिहास ज्या साधनांच्या आधारे लिहीला जातो त्यांना इतिहासाची साधने असे म्हणतात. या साधनांमध्ये ताम्रपट, शिलालेख, कलाकृती, कागदपत्रे, आत्मचरीत्रे, प्रवासवर्णने, वस्तू वा वास्तू अशा अनेक बाबींचा समावेश होतो. ऐतिहासिक साधनांचे भौतिक आणि वाङमयीन असे दोन प्रकार पडतात. भौतिक साधनांनाच अलिखीत किंवा पुरातत्वीय साधने असे म्हणतात.

***प्रस्तावना :***

पुरातत्वीय साधनांमध्ये इतर साधनांप्रमाणेच शिलालेख हे महत्त्वाचे भौतिक स्वरूपातील ऐतिहासिक साधन मानले जाते, कारण त्यातून तत्कालीन मानवी जीवनाचा इतिहास साधार पहावयास मिळतो. शिलालेख कोरण्याची कला प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. सम्राट अशोकाच्या काळातील मोठ्याप्रमाणावर शिलालेख उपलब्ध आहेत. मध्ययुगीन आणि मराठा काळातही गड-किल्ल्यांवर शिलालेख पहावयास मिळतात. त्यातून त्या त्या राजवटींची महत्त्वपूर्ण माहीती उपलब्ध होत असल्याने शिलालेखांकडे इतिहासाची महत्त्वपूर्ण साधने म्हणून पाहीले जाते.

***अवचित गडावरील शिलालेख***

रायगड जिल्ह्यातील रोहा या शहराजवळ कुंडलिका नदीच्या उत्तर दिशेस अवघ्या ३२० मीटर उंचीचा अवचित गड नावाचा किल्ला आहे. सर्वच बाजूंनी तटबंदी असून दक्षिणेच्या बुरूजावर एक शिलालेख आहे.

***श्री श्री गणेश य नमा श्री बा***
***म संवत्सर चैत्र सु द 1 प्रतिपदा***
***प देव सके 1718 नलना***

हा वाचन झालेला शिलालेख सन १७९६ मधील आहे. बाजी पासलकरांचा या किल्ल्याशी संबंध आला होता. या वर्षी किल्ल्याची डागडुजी व काही बांधकामे केली असावीत म्हणूनच बुरूजावर असा शिलालेख कोरला गेला असल्याची शक्यता आहे. हा किल्ला शिलाहार कालीन असला तरी शिवरायांच्या काळात त्याची पुर्नबांधणी केली असावी.[१]

### *आग्वाद (गोवा) किल्ला शिलालेख*

”पोर्तुगालमध्ये राजा फिलीप दुसरा सत्तेवर असतांना त्यांच्या आज्ञेनुसार आश्रयास येणाऱ्या गलबतांना संरक्षण आणि मदत मिळण्यासाठी सन १६१२ मध्ये हा किल्ला तयार झाला. तेव्हा रूब द ताव्होरा हे व्हॉईसराय होते.“

अशा अर्थाचा हा शिलालेख पोर्तुगीज भाषेत होता. या किल्ल्यावर शिवरायांनी सन १६६६ मध्ये हल्ला चढविला होता. मात्र सदरच्या मोहीमेत अपयश आले.

### *गारजाई शिलालेख – किल्ले घनगड*

पुणे जिल्ह्यातील घनगड नावाचा एक दुर्गम दुर्लक्षित असा किल्ला आहे. गड लहानसा असल्याने फारसा परिचित नाही. गडाखाली यकोले गावात एक मंदिर आहे. या मंदिराच्या जिर्णोद्धाराप्रसंगी मंदिरात एक शिलालेख लावण्यात आला आहे.

***श्री गार जाई माहा***
***राजाची व की ले घनगडची***

या शिलालेखावरून असा स्पष्ट उल्लेख मिळतो की, ‘ही देवी गारजाई व हा किल्ला घनगड आहे’ काहीजण मात्र या किल्ल्याचा धनगड असा उल्लेख करतात. असे असलेतरी मंदिराचा काळ, कोणत्या राजाने बांधले याचा उल्लेख मात्र मिळत नाही.[२]

### *जलमहालातील शिलालेख – किल्ले नळदुर्ग*

उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर पासून ३२ किलोमीटरवर साधारणतः अडीच किलोमीटर घेर असलेला नळदुर्ग हा भुईकोट किल्ल्याचा मुकूटमणी असलेला किल्ला आहे. या किल्ल्याचा इतिहास राजा नल व राणी दमयंतीपर्यंत मिळतो. चालुक्य, बहामनी, आदिलशाही असा काळ पाहिलेल्या नळदुर्गास सन १७५८ मध्ये बाळाजी बाजीराव पेशव्याने स्वराज्यात आणला. या दुर्गात जलमहाल ही प्रसिद्ध वास्तू पहावयास मिळते. या वास्तूच्याच पश्चिमेकडील भिंतीवर पारशी भाषेत एक शिलालेख आहे.

***‘आज दीदन ई चष्म मुहिब्बान रोशन***
***मीगदर्द व चष्म दुष्मनान गर्दद कूर’***

याचाच अर्थ असा की, ‘या जलमहालाकडे पाहिल्यास मित्राचे डोळे प्रसन्नतेने उजळतील तर शत्रूंच्या डोळयापुढे अंधारी येईल.’[३]

### *भांडार गडावरील शिलालेख*

ठाणे जिल्ह्यात आसन गावाजवळ माहुली-भंडारगड-पळसगड असे तीन जोडकिल्ले आहेत. या किल्ल्यांचे बांधकाम कोणत्या राजवटीत झाले याचा उल्लेख नसला तरी सन १४८५ च्या काळात निजामशाहीत हा किल्ला होता. माहुली किल्ल्याला लागून असलेल्या मोठ्या खिंडीतून गेल्यास भंडारगडाच्या माथ्यावर जाता येते. या माथ्याच्या पश्चिम बाजूला कल्याण नावाचा मुख्य दरवाजा लागतो. या मुख्य दरवाजाच्या आतल्या अंगास मराठी भाषेतील शिलालेख आहे.

***दरवाजा टांकास बैजदार दुर***
***गमैरैर । संवतुसतससैप***
***चीसवैरच्या राजयतेस ।।***[4]

शिलालेख जरी मराठी भाषेतील असला तरी कोणत्याही राजवटीचा, कालखंडाचा किंवा घटनेचा अर्थबोध होत नाही. ज्यावेळेस हा शिलालेख जाणकारांकडून वाचला जाईल तेव्हा माहीती मिळू शकेल !

### *श्री जगदीश्वराचा शिलालेख – किल्ले रायगड*

शिवछत्रपतींनी सन १६५६ मध्ये जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा पराभव करून रायरी, वासोटा, भोरप्याचा डोंगर अशी महत्त्वाची बलस्थाने जिंकून घेतलीत. शिवरायांनी प्रत्यक्ष जावून राजधानी करीता रायरीची निवड केली. लवकरच अनेक वास्तुंनी सज्ज असा रायगड राजधानीचे मुख्य ठिकाण बनला. याच गडावर महाराजांनी स्वतःला राज्यभिषेक करवून घेतला. याच गडावर महाराजांच्या समाधीच्या समोरच भींतीवर एक षिलालेख आहे.



*अर्थ* – सर्व जगाला आनंद देणारा असा हा जगदीश्वराचा प्रासाद सिंहासनाधिश्वर श्रीमद् छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञेने शके १५९६ मध्ये आनंदनाम संवत्सराच्या सुमुहुर्तावर तयार केला. हिरोजी या शिल्पकाराने विहीरी, तळी, घरे, बागा, रस्ते, स्तंभ, गजशाळा, उंच राजगृहे अशी केलेली उभारणी ही चंद्रसूर्य असे पावेतो खुशाल नांदो.

तसेच या भिंतीलगत असलेल्या दरवाज्याच्या पायरीवर हिरोजीच्या नावाचा दुसरा एक शिलालेख आहे. शिलालेखात हिरोजी इटलकर असा नाव असला तरी तो इंदलकर यांचेच नाव दर्शविणारा असावा.[५]

### *नाना फडणीसांचा शिलालेख – किल्ले लोहगड*

छत्रपती शिवरायांनी स्वतः बांधून काढलेल्या किल्ल्यांमध्ये एक महत्त्वाचा गड म्हणजेच मुंबई–पुणे रस्त्यावर लोणावळ्याजवळ असलेला लोहगड होय. महाराजांनी सुरतमधून मिळविलेली खंडणी या गडावरील लक्ष्मीकोठा या भुयारात सुरक्षित ठेवली होती. याच गडाच्या गणेशदरवाज्याच्या पट्टीवर एक शिलालेख आहे.

***'श्री गणेशायनमः गणेश दरवाजा बांधला बा –***
***काजी जनार्दन फडणीस वीद्यमान धों –***
***डो बल्लाळ नीजसुरे प्रारंभ शके 1712***
***साधारण नाम संवत्सरे अस्वीन शु –***
***ध 9 नवमी रवीवार समाप्त शके –***
***1716 आनंदनाम संवत्स –***
***रे ज्येष्ठ सुध त्रयोदसी बु –***
***ध वार कता (र्त) व्य जयाजी***
***धनराम गवडी त्रिव***
***कजी सुतार'*** [6]

शिलालेखातील उल्लेखानुसार या गणेश दरवाजाचे काम हे दिनांक ०१/११/१७९० ते ११/०६/१७९४ या कालावधीत नाना फडणीसांनी केलेले आहे. असाच एक शिलालेख लोहगडावरील उंचीच्या मध्यभागात विंचूकाटा माचीकडील भागात एक मोठा तलाव असून त्याचे बांधकाम दगडांनी केले आहे. तलावाच्या पूर्वेस खाली उतरण्याकरिता पायऱ्या आहेत. याच पायऱ्या उतरतांना डाव्या बाजूला वरच एक शिलालेख आहे. याविषयीचा उल्लेख उपलब्ध झाला नाही.



***सज्जनगडावरील पारशी शिलालेख***

सातारा शहरापासून ईशान्येस ठोसेघर मार्गाने १३ ते १५ कि.मी. वर असलेल्या सज्जनगडावर जाता येते. समर्थ स्वामी रामदास यांच्या वास्तव्याने या गडास सज्जनगड असे नाव पडले आहे. गडावर पायऱ्यांच्या वाटेने चढत गेल्यास प्रारंभी छत्रपती शिवाजी प्रवेशद्वार लागते. पुढे महाप्रवेशद्वार असून त्याच्या दोन्ही बाजूस देवड्या आहेत. एका अंगाला हनुमान तर दुसऱ्या अंगाला वराह यांच्या मूर्ती आहेत. महत्त्वाचे म्हणजे महाद्वारातून आत गेल्यास उजव्या भींतीवर पारशी भाषेत एक शिलालेख त्याच्या खाली अनव्यार्थासह पहावयास मिळतो.

१. ऐश्वर्य तुझ्या दारांतून तोंड दाखवीत आहे.



२. तूं विवंचना दूर होण्याचे स्थान युक्त आहेस, परंतू पुन्हां विवंचना युक्त आहेस.
३. तुझ्या पासून सर्व विवंचना दूर होतात.
४. ईश्वरदत्त धैर्य व कर्तृत्व हे सर्व फुलांना प्रफुल्लीत करीत आहे. [७]

***साल्हेर गडावरील शिलालेख***

बागलाण प्रांतातील नाशिक जिल्ह्यात साल्हेर-मुल्हेर ही महत्त्वाची ठिकाणे आहेत. मुल्हेर येथे बागुलवंशीय हिंदु राजाची सत्ता असल्याने या प्रदेशास बागलाण हे नाव पडले असल्याचे सांगितले जाते. तर लागूनच असलेल्या साल्हेर गड महाराष्ट्रातील सर्वाधिक उंचीचा गड मानला जातो. बागलाण प्रांतातील हा अतिशय अवघड चढणीचा एक बुलंद गड आहे. डांग व बागलाण सीमावर्ती असलेला साल्हेर हा गड दळणवळणाच्या घाट रस्त्यावरील सहा वाटांवर हेरगिरी करण्यास महत्त्वाची भूमिका बजावणारा असल्याने त्यास साल्हेर नाव पडले आहे. भवानी मातेच्या मंदिराजवळून गडावर जाता येते. पहिले दोन द्वारे पार केल्यावर तिसरे दक्षिणमुखी भव्य प्रवेशद्वार लागते. या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजुला एक शिलालेख आहे. हा शिलालेख ऊन-वारा-पाऊस यामुळे थोडा झिजलेला असला तरी त्यावर कोरलेले अक्षरे स्पष्ट दिसतात.[८]



***सिंहगडावरील बाळाजी बाजीराव कालीन शिलालेख***

तसेच ज्या सिंहगडावर तानाजी मालुसरेंनी बलिदान देवून गड स्वराज्यात आणला त्या गडाच्या दुसऱ्या

दरवाज्याच्या वर एक शिलालेख आहे.

श्रीशालिवाहन शके १६७२ कारकी
र्द श्रीमंत बाळाजी बाजीराव पंडीत प्रधान

### *आठ शिलालेखांचा हरिश्चंद्रगड*

नगर-ठाणे-पुणे या जिल्ह्यांच्या सरहद्दीवर 'हरिश्चंद्रगड' आहे. पुण्याहून जुन्नर आणि जुन्नरहून अणे-माळशेज घाटातून खिरेश्वर गावी जाता येते. याच गावातून गडावर जाता येते. गडावर हरिश्चंद्रेश्वर मंदिर परिसरात आठ शिलालेख आहेत. पहिला मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डाव्याबाजूला दुसरा व तिसरा केदारेश्वर लेणीच्या खांबावर तर चौथा शिलालेख मंदिराच्या डाव्या खांबावर त्याच ठिकाणी पाच ते सात आहेत तर आठवा मंदिराच्या ओट्यावरील गणेशमूर्तीच्या मागील बाजूस आहे. या लेखांमध्ये चांगा वटेश्वराच्या म्हणजे योगी चांगदेवांचा उल्लेख आहे.[६]

थोडक्यात अवचितगडावरील शिलालेखातून शिवरायांचे निकटचे वरिष्ठ मित्र सहकारी बाजी पासलकरांच्या या गडाशी असलेल्या संबंधाचा निर्देश मिळतो तर गोवा किल्ल्यातील पोर्तुगीज भाषेतील शिलालेखातून पोर्तुगीतांच्या राजवटी वाटचालीचा इतिहास आपणास समजण्यास मदत होते. काही शिलालेख गडांवर प्रवेशद्वार, तलाव, विहीरी अशा ठिकाणी बसविण्यात आले आहेत तर काही शिलालेख गडांवरील व गडपायथ्यांशी असलेल्या मंदिरांमध्ये बसविण्यात आले आहेत. असाच एक घनगड (जि. पुणे) पायथ्याशी असलेल्या मंदिरात लावण्यात आला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील नळदुर्ग मधील जलमहालात असलेल्या शिलालेखातून मित्रत्वाला अनुकूल व शत्रुत्वाला प्रतिकूल असा निर्देश दिला आहे. स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावर महाराजांच्या समाधीसमोरच दरवाज्याच्या डाव्या बाजूलाच शिलालेख आहे. त्यातून महाराजांच्या राज्यभिषेकांसंबंधीची माहीती मिळते तर लोहगडावरील शिलालेखातून गणेश दरवाजा नाना फडणीसांनी बांधला असल्याचा उल्लेख वाचावयास मिळतो. सज्जनगडावरील शिलालेखातून सुभाषित दिलेले आहे तसेच हरिश्चंद्रगडावरील आठ शिलालेखांमधून योगी चांगदेवाच्या कार्याचा उल्लेख मिळतो. काही शिलालेखांचे वाचन झाले नसल्याने त्यातील उल्लेख मिळत नाहीत. असे असले तरी हे शिलालेख मराठ्यांच्या इतिहासाची महत्त्वपूर्ण अषी ऐतिहासिक साधने मानले जातात.

### *संदर्भ :*

१) घाणेकर प्र. के., साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०११, पृ. २६
२) तत्रैव, पृ. ७१.
३) तत्रैव, पृ. १३७
४) तत्रैव, पृ. १८८
५)आवळसकर शांताराम विष्णू, रायगडची जीवनकथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृती मंडळ, मुंबई, २००८, पृ.११
६) प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दिनांक ६ नोव्हेंबर २०१०
७) प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दिनांक ४ ऑक्टोबर २०१०.
भट रवींद्र (संपा.), सचित्र सज्जनगड, श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, सुधारित आवृत्ती, २००६, ृ. १२.
८) प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दिनांक १० ऑक्टोबर, २०१०
६) चिले भगवान पांडुरंग, गडकोट, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर, २००४, पृ. ८२



***अनिल माणिकराव बैसाणे***
इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.in